दुरध्वनी क्र.२८१९३०८७,
अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (आस्थापना)
यांचे कार्यालय, मिरा भाईंदर महानगरपालिका,
भाईंदर (प.), ता.जि.ठाणे ४०११०१.
जा.क्र.माअधि/अपिल/००९/२०१९
दि.०१/०२/२०१९.

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (आस्थापना), मिरा भाईंदर महानगरपालिका यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (१) अंतर्गत दाखल झालेले प्रथम अपील.**

श्री.संतोष श्री साळकर,
००४, बी-५६, सेक्टर-१,
लक्ष्मी ज्योत को.हौ.सो.लि.,
शांती नगर, मिरारोड (पूर्व)
ठाणे ४०११०७.

................अपिलार्थी

जनमाहिती अधिकारी तथा,
आस्थापना अधिक्षक (आस्थापना)

................प्रतिवाद

## -: विवेचन :-

श्री.संतोष श्री साळकर यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ नुसार जनमाहिती अधिकारी तथा आस्थापना अधिक्षक (आस्थापना) यांचेकडे दि.१७/११/२०१८ रोजीच्या अर्जान्वये खालील माहिती मिळणेबाबत अर्ज सादर केला.

**विषय:- दि.१५/१०/२०१८ रोजी दिलेल्या अर्जाबाबत.**

१) मी दिलेल्या अर्जाबाबत मा.आयुक्त सो. श्री.बालाजी खतगांवकर, मिरा भाईंदर महानगरपालिका यांनी या महानगरपालिकेचे प्रमुख म्हणून या अर्जाबाबत कर्तव्य पार पाडले. या संबंधित विषयाबाबत सर्व कागदपत्रांच्या छायांकित प्रमाणित प्रती मिळण्याबाबत.

२) मा.महापौर, उप-महापौर व विरोधी पक्ष नेते यांनाही दिलेल्या प्रतीबाबत त्यांनी सामान्य जनतेबाबत एक जबाबदार प्रतिनिधी म्हणून याबाबत केलेल्या कारवाई बाबतचे सर्व कागदपत्रांचा प्रती मिळण्याबाबत.

**अपिल दाखल करण्याची कारणे:-**

माहिती अधिकार अंतर्गत कोणतीही माहिती देण्यात आली नाही. दिशाभूल करण्यात आली असल्याने अपिलार्थी यांनी दि.२३/०१/२०१९ रोजी प्रथम अपिलीय अधिकारी तथा आस्थापना अधिक्षक (आस्थापना) यांचेकडे प्रथम अपिल दाखल केले.

**सुनावणीचा तपशिल:-**

अपिलार्थी व जनमाहिती अधिकारी तथा आस्थापना अधिक्षक (आस्थापना) यांना प्रथम अपिलाच्या सुनावणीस दि.०१/०२/२०१९ रोजी सायं.०४.१० वाजता उपस्थित राहण्याबाबत जा.क्र.मिभामनपा/उपआ.आस्था/०११/२०१९ दि.३०/०१/२०१९ अन्वये कळविण्यात आले आहे.

सबब, जनमाहिती अधिकारी तथा आस्थापना अधिक्षक (आस्थापना) व अपिलार्थी अर्जदार सुनावणीस उपस्थित आहेत.

१) **अपिलार्थी यांचा सुनावणी दरम्यान युक्तिवाद**:- कोणतीही माहिती देण्यात आली नाही. दिशाभूल करण्यात आली. तसेच दि.०८/०१/२०१९ रोजी व्यक्तिशः कार्यालयात भेट घेतल्यावर दोन दिवसांत माहिती देतो असे सांगितले पण आजतागायत देण्यात आली नाही.

२) **जन माहिती अधिकारी यांनी सुनावणी दरम्यान केलेला युक्तिवाद:-** अपिलार्थी अर्जदार यांना माहिती देण्यात आलेली आहे.

वरील वस्तुस्थिती विचारात घेऊन खालीलप्रमाणे निर्णय देण्यात येत आहे.

**-: निर्णय :-**

१) जनमाहिती अधिकारी तथा आस्थापना अधिक्षक (आस्थापना) यांनी अपिलार्थी अर्जदारास १० दिवसांत अभिलेखात उपलब्ध असणारी सुधारित माहिती विनाशुल्क स्वरुपात देण्यात यावी. वरील निर्देश देऊन अपिल निकाली काढण्यात येत आहे.

२) सदर आदेशाविरुध्द अपील करावयाचे असल्यास मा.राज्य माहिती आयुक्त, महाराष्ट्र, कोकण खंडपीठ, ५ वा मजला, दालन क्र.५२८, कोकण भवन, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४००६१४ यांच्याकडे सदर आदेशाच्या दिनांकापासून ९० दिवसांच्या आत अपील दाखल करता येईल.

**(विजयकुमार म्हसाळ)**
**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**उपायुक्त (आस्थापना)**
**मिरा भाईदर महानगरपालिका**

O/C

**प्रति:-**

१) श्री.संतोष श्री साळकर,
००४, बी-५६, सेक्टर-१,
लक्ष्मी ज्योत को.हौ.सो.लि.,
शांती नगर, मिरारोड (पूर्व)
ठाणे ४०११०७.

स्पीड पोस्ट

२) जन माहिती अधिकारी तथा
आस्थापना अधिक्षक (आस्थापना)

for
५/२/२०१९

३) माहिती अधिकार अपिल नस्ती
प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उपायुक्त (आस्थापना) यांचे कार्यालय.